

वाकड ते मामुर्डी दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीतून होणार कायमची सुटका

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 08/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 150 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# हिंजवडीसह सात गावे पिंपरी-चिंचवड महापालिकेत समाविष्ट!

## कार्यवाहीचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पुणे जिल्ह्यातील मुळशी व मावळ तालुक्यातील सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समावेश करून त्यांचा शाश्वत विकास करण्याच्या मागणीसाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांना अधिकृत निवेदन सादर केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटीवेळी खासदार श्रीरंग बारणे हेही उपस्थित होते. या निवेदनाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना संबंधित विषयानुसार तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मागणीवर त्वरित प्रस्ताव सादर करण्याचे आदेश नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना दिले.

आमदार जगताप यांच्यासमवेत वसंत साखरे, प्रकाश बुचडे, बाबासाहेब साखरे, आनंद बुचडे,



तानाजी हुलावळे, बाबासाहेब बुचडे, दिलीप हुलावळे, लहू गायकवाड, संजय जाधव, रोहन जगताप, विक्रम साखरे, सचिन लोंढे, सचिन शिंदे आदी कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच आयटीयन्स देखील होते.

कोणती आहेत ही गावे? हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांबे (ता. मुळशी), सांगवडे व गहुंजे(ता. मावळ) या सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्यासाठी २०१८ सालीच महापालिकेने ठराव करून शासनाकडे सुधारित प्रस्ताव पाठवला आहे. मात्र अद्याप निर्णय झालेला नाही.

मागणी मागील प्रमुख कारणे: - राजीव गांधी आयटी पार्कमुळे या परिसरात आयटी व औद्योगिक प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभारले गेले आहेत. - मोठ्या प्रमाणावर आयटीयन्स व बाहेरील नागरिक येथे स्थायिक झाले आहेत. - या सात गावांची एकत्रित तरंगती लोकसंख्या अंदाजे २ लाखांवर पोहोचली आहे. - यामुळे रस्ते, पाणी, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, वाहतूक यंत्रणा यावर ताण वाढला आहे. - विविध शासकीय यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने विकासकामे रखडली आहेत.

समावेश झाल्यास होणारे फायदे - 1. एकसंध नागरी प्रशासनाखाली नियोजनबद्ध व शाश्वत विकास 2.समन्वित व जलद निर्णयक्षम व्यवस्था 3. वाहतूक समस्यांवर ठोस उपाय 4. आवश्यक नागरी सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध 5. उद्योग व आयटी क्षेत्राला भरपूर सहकार्य 6. शासनाच्या महसुलीत वाढ

> “ या विषयासंदर्भातील निर्णय त्वरित व्हावा यासाठी आमदार कार्यालय सातत्याने पाठपुरावा करत असून, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे या मागणीला लवकरच मूर्त स्वरूप मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.
>
> “या भागांचा विकास ग्रामपंचायतीच्या क्षमतेबाहेर गेला आहे. नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी आणि नियोजनबद्ध नागरीकरणासाठी या गावांचा तातडीने पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश होणे अत्यावश्यक आहे,” ”
>
> -आमदार शंकर जगताप

# पुणे पोलीस दलात होणार एक हजार पोलीस दाखल !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : ‘पुणे पोलीस दलात लवकरच एक हजार पोलीस कर्मचारी दाखल होणार आहेत. शहराचा वाढता विस्तार विचारात घेऊन अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे,’ अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी दिली.नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या आमदार निधीतून सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी भागात आनंदनगर पोलीस चौकीची इमारत बांधण्यात आली आहे. नवीन पोलीस चौकीचे




उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी पाटील बोलत होते. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त अजय परमार, सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईगडे आदी या वेळी उपस्थित होते.

शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवणे, तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी नागरिक, लोकप्रतिनिधी आणि पोलिसांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. महाराष्ट्र पाेलीस दलात २० हजार पोलीस कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे. भरती प्रक्रियेत निवड झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे सध्या प्रशिक्षण सुरू आहे. त्यापैकी एक हजार पोलीस कर्मचारी पुणे पोलीस दलाला उपलब्ध करून देण्यात आले आहेत’, असे पाटील यांनी नमूद केले.पुणे शहराचा विस्तार वाढत आहे. गृहविभागाने सात नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी दिली आहे. सीसीटीव्ही यंत्रणेसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. पोलीस दलात मनुष्यबळ वाढवून देण्यात आले आहे. कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

# आपत्कालीन यंत्रणेने दक्ष राहावे - आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. पवना व मुळशी धरणात पाण्याची आवक वाढली असल्याने या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन देखील आयुक्त सिंह यांनी केले आहे.





सकाळी १० वाजल्यापासून पवना धरणातून पवना नदीपात्रात २ हजार ८०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे. तर दुपारी २ वाजल्यापासून मुळशी धरणातून मुळा नदी पात्रात ८ हजार २०० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. हवामान विभागाने पुढील काही तास धरण क्षेत्र आणि घाटमाथ्यावर पाऊस होण्याचा इशारा दिला असल्याने धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पवना आणि मुळा नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहावे. नदीपात्राजवळ कोणीही जाऊ नये, असेही आवाहन करण्यात येत आहे.

महापालिकेची यंत्रणा सज्ज

आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ प्रतिसाद देऊन कार्यवाही करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. मदत व बचाव पथकेही आवश्यक उपकरणासह सज्ज ठेवण्यात आली आहेत. आपत्तीमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना तत्काळ मदत मिळण्यासाठी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्यात आला आहे. तसेच महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उप आयुक्त व सहाय्यक आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रातील पावसाबाबत तसेच धरणातून नदीपात्रात करण्यात येणाऱ्या विसर्गाबाबत अद्यावत माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकृत समाज माध्यमांवर (फेसबुक, एक्स (पूर्वीचे ट्विटर), इंस्टाग्राम ) दिली जात आहे. तरी नागरिकांनी अद्यावत माहितीसाठी महापालिकेच्या समाज माध्यमांना भेट द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# वाकड ते मामुर्डी दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीतून होणार कायमची सुटका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड : वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत, किवळे, मामुर्डी या भागातील अंडरपासजवळ होत असलेली वाढती वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय योजना आणि सेवा रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी एक महत्त्वाची आढावा बैठक आमदार शंकर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील ९.७ किमी लांबीच्या सेवा रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरण व देखभालीच्या कामांची सविस्तर चर्चा होऊन एक वर्षाच्या आत काम पूर्ण करण्याच्या सूचना बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.



बैठकीत शंकर जगताप यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या की, सेवा रस्ते ही दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची यंत्रणा असून, त्यांची देखभाल व सुधारणा तातडीने आणि प्राधान्याने करण्यात यावी. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील मुख्य चौकांमध्ये होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि कामांदरम्यान नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी हिंजवडी सयाजी हॉटेल समोर, भूमकर चौक, ताथवडे, पुनावळे, रावेत-समीर लॉन्स, पवना नदी लगत, मुकाई चौक व ताथवडे येथे "पुश बॅक स्ट्रक्चर" पद्धतीचा अवलंब करण्याची सूचना त्यांनी दिली. या पद्धतीने कामाचा वेग वाढवता येईल आणि वाहतुकीवर परिणाम होणार नाही.

यासोबतच, पिंपरी-चिंचवड महापालिकेशी समन्वय साधून PQC कॉंक्रीट रस्त्यांची कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) चे प्रकल्प संचालक संजय कदम, वरिष्ठ अभियंता सुभाष घंटे, अभियंता ओंकार जगदाळे, सल्लागार संस्था प्रतिनिधी परमेश्वर अरवतकर, अनंत कुलकर्णी आणि राकेश कोळी (रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर), तसेच हरेन यादव व विक्रम पाटील (DMR इन्फ्रा) हे उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कार्यकारी अभियंता सुनील शिंदे, उपअभियंता रवींद्र सूर्यवंशी, चंद्रकांत मोरे, सल्लागार इन्फ्राकिंग आणि संबंधित विविध विभागांचे प्रतिनिधीही बैठकीला हजर होते.या बैठकीत झालेल्या निर्णयांमुळे स्थानिक नागरिकांची वाहतूक कोंडीपासून कायमची सुटका होणार आहे. आमदार कार्यालयाकडून या कामांवर नियमित पाहणी व पाठपुरावा करण्यात येणार आहे.-आमदार शंकर जगताप

# पिस्तुलाचा धाक दाखवत बेदम मारहाण!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : हॉर्न वाजवल्यामुळे एकाने चालकाला पिस्तुलाचा धाक दाखवत बेदम मारहाण केल्याची घटना चिखलीमध्ये घडली आहे. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात अज्ञात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेप्रकरणी अनिकेत चौधरी यांनी चिखली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पैकी एकाला चिखली पोलीसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

अनिकेत चौधरी त्यांच्या मित्रासह त्रिवेणी नगर चौक तळवडे रस्त्यावरून राहत्या घरी जात होते. रस्त्यावरून जात असताना भरधाव चारचाकी गाडीला समोरील व्यक्ती हॉर्न वाजवूनही पुढे जाऊ देत नव्हता. दोन- तीन वेळेस हॉर्न वाजवल्यानंतर आरोपींनी तक्रारदार अनिकेत चौधरींच्या वाहनासमोर आडवी गाडी लावली. आरोपींनी खाली उतरून तक्रारदार अनिकेत चौधरी धक्काबुक्की केली.जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या डोक्याला पिस्तूल लावलं. हाताने बेदम मारहाण केली. पिस्तुलाच्या मुठीने अनिकेत चौधरी यांना डोक्यात मारून गंभीर जखमी केलं.

तसेच आरोपी यांनी फिर्यादी यांच्याकडील परवानाधारक पिस्तूल हिसकावून घेतले. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात अनिकेत चौधरी यांनी तीन जणांविरोधात तक्रार दिली आहे. पैकी एकाला चिखली पोलिसांनी अटक केली आहे. इतर दोघांचा शोध पोलीस घेत आहेत. ही घटना मध्यरात्री दीडच्या सुमारास घडली आहे.

# चिंचवडमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी - थेरगाव येथील श्री दत्तनागरी सहकारी पतसंस्था आणि विश्वजीत श्रीरंग बारणे यांच्या वतीने १० वी १२ वी २०२५ मध्ये माध्यमिक उच्चमाध्यमिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ४५० विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात यश मिळविलेल्यांचाही शिवसेना खासदार श्रीरंग बारणे आणि लग्नाची वेडी- सिंधू या मराठी मालिकेतील अभिनेत्री सायली देवधर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात रविवारी झालेल्या कार्यक्रमाला युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, शिवसेना महिला उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना जिल्हा प्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढरकर, शहरप्रमुख निलेश तरस, शहर संघटिका सरिता साने, माजी नगरसेविका विमल जगताप, युवती सेनेच्या रितू कांबळे, युवतीसेना जिल्हा संघटिका सायली साळवी, श्री दत्तनागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष दिलीप बोंबले पाटील, संचालक हनुमंत माळी, धनाजी बारणे, बळीराम शिंदे, अनंत येळवंडे, गोपाळ बेलगे, दिपाली गुजर, संतोष बारणे व मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक उपस्थित होते. थेरगाव येथील श्री दत्तनागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो.

खासदार बारणे म्हणाले, अतिशय स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी प्रचंड कष्ट करण्याची क्षमता ठेवावी. आई-वडील हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण देत आहेत. त्याची जाणीव ठेवून अभ्यास करावा. आताच्या काळात केवळ पदवी मिळण्यास महत्व देऊ नये, बौद्धिक, व्यावसायिकही ज्ञान घेतले पाहिजे. शिक्षणाला मर्यादा नाही. गुणांच्या टक्केवारीत वाढ झाली असून काहींना १०० टक्के गुण मिळत आहेत. प्रत्येकाच्या अंगात काही तर सुप्त गुण असतात. कला असते. ते ओळखून ध्येय ठेऊन वाटचाल करावी. ध्येयवादी रहावे. त्यादृष्टीकोनातून शिक्षण निवडावे आणि त्यात यश मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. विश्वजीत बारणे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच खेळ, अध्यात्माला महत्व द्यावे. स्मरण शक्ती, ताणतणावमुक्त राहण्यासाठी व्यायाम केला पाहिजे. सोशल मिडियाचे जेवढे फायदे, तेवढे तोटेही आहेत. डिजीटल युगात सोशल मिडियाचा प्रचंड वापर वाढला आहे. त्याचा वापर करताना काळजी घेतली पाहिजे. त्यामध्ये वाहत जाऊ नये.

चांगल्या गुणांनी दहावीत उत्तीर्ण झालेल्या समिक्षा नितीन अगरवाल , शमिका सुनील माईनकर , कवीश श्रीवास्तव , श्रेया विशाल ताठे

सिद्धीता आनंद जाधव, स्नेहा विजय गाडगीळ, अथर्व सुनील फाळके, बारावी उत्तीर्ण झालेल्या समिक्षा जयसिंग परमार , पारस संदीप जगदाळे , समिक्षा बापूसाहेब सानप , तनिष्का संजय पवार यांचा गौरव करण्यात आला.

तर, प्रांजल आरुण जाधव हिचा रोलिंग बॉल स्पर्धेत सुर्वण पदक मिळवल्याबद्दल , तसेच वैभव गणेश रोकडे याचा ( पीएसआय) झाल्याबद्दल व ऋषिकेश सुनिल भांगरे सीडीएस परीक्षा उत्तीर्ण होऊन लेप्टनन पदावरती सिक्कीम येथे पोष्टींग झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

# 'येरे येरे पैसा ३' मधील 'उडत गेला सोन्या' साँग प्रदर्शित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

'येरे येरे पैसा ३' या बहुप्रतिक्षित मराठी चित्रपटाची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा आहे. ट्रेलरला आणि टायटल ट्रॅकला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर आता या चित्रपटातील दुसरे गाणे 'उडत गेला सोन्या' प्रदर्शित झाले असून, त्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. हे गाणे एका वेगळ्या आणि मनोरंजक पद्धतीने सादर करण्यात आले आहे. चित्रपटाच्या पहिल्या भागात सनी आणि बबलीचे गोड प्रेम प्रेक्षकांनी अनुभवले होते. परंतु आता 'येरे येरे पैसा ३' मध्ये सनीचे लग्न दुसऱ्याच मुलीशी होत असल्याने बबलीचे मन तुटले आहे. बबली तिच्या मनातील भावना या गाण्यातून व्यक्त करताना दिसतेय. या गाण्याची पार्श्वभूमी जरी भावनिक असली तरी हे गाणे जबरदस्त संगीत आणि हटके स्टाईलमध्ये सादर करण्यात आले आहे. हे 'जेन झी' ब्रेकअप साँग प्रेक्षकांना थिरकायला लावणारे असून याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. गाण्याचे खास आकर्षण म्हणजे निर्माते




अमेय खोपकर यांचे सुपुत्र ईशान अमेय खोपकरही या गाण्यात दिसत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने ईशानचे मराठी चित्रसृष्टीत पदार्पण झाले आहे. तर या गाण्यात चित्रपटातील इतर कलाकारांसोबतच सोनाली खरेचीही झलक दिसत आहे.

सायली पंकज, रविंद्र खोमणे, राधा खुडे, सौरभ साळुंके, मुनव्वर अली, अपूर्वा निशाद व सावनी भट्ट यांच्या जबरदस्त आवाजातील या गाण्याला पंकज पडघन यांचे संगीत लाभले असून डॉ. विनायक पवार यांनी या गाण्याचे बोल लिहिले आहे.

दिग्दर्शक संजय जाधव म्हणतात, "येरे येरे पैसा ३' मध्ये सनी-बबलीच्या नात्याला एक इमोशनल तरीही फन टच द्यायचा प्रयत्न केला आहे. हे एक मजेशीर गाणे असले तरी या गाण्यात खूप काही घडत आहे. ज्याने कथा पुढे जातेय. आता ते काय आहे याचे उत्तर चित्रपटगृहातच मिळेल."

निर्माते अमेय खोपकर म्हणतात, " हे गाणे माझ्यासाठी खूप खास आहे. कारण या गाण्यातून माझ्या मुलाचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण झाले असून हा आमच्यासाठी एक भावनिक क्षण आहे.मला खात्री आहे संगीतप्रेमींना हे गाणं नक्कीच आवडेल."

निर्माते निनाद बत्तीन म्हणतात," हे गाणे भावनिक आणि मनोरंजक आहे. सनी-बबलीच्या नात्याचा हा टर्निंग पॉईंट असून, त्यातली मजा आणि स्टोरी पाहाणे प्रेक्षकांसाठी रंजक ठरेल हे नक्की."

धर्मा प्रॉडक्शन्सचे अपूर्व मेहता म्हणतात, " ये रे ये रे पैसा' ही सिरीज मजा आणि मनोरंजनासाठी ओळखली जाते आणि हे गाणे त्याला चारचाँद लावणारे आहे."

धर्मा प्रॉडक्शन्स प्रस्तुत अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स निर्मित या चित्रपटाची सहनिर्मिती वर्डविझार्ड एंटरटेनमेंटने केली आहे. सुधीर कोलते, ओमप्रकाश भट्ट, नासीर शरीफ, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन, गिरीधर गोपाळकृष्ण धुमाळ हे चित्रपटाचे निर्माते असून सौरभ लालवाणी सहनिर्माते आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शन संजय जाधव यांनी केले आहे. कलाकारांच्या यादीत संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर, ईशान अमेय खोपकर, ईशान खोपकर यांच्यासह आणखी काही चर्चित चेहरे दिसणार आहेत. येत्या १८ जुलैला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# गांजा विक्री करणाऱ्या दोघांना अटक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : गांजा विक्रीसाठी आलेल्या दोन तरुणांना अमली पदार्थ विरोधी पथकाने कात्रजमधील आंबेगाव परिसरात पकडले. त्यांच्याकडून चार लाख २९ हजार रुपयांचा २९ किलो गांजा जप्त करण्यात आला.

अक्षय अंकुश माने (वय ३०, रा. घोरपडे पेठ), यश राजेश चिवे (वय १९, रा. दांडेकर पूल) अशी अटक



करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दोघांविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माने आणि चिवे हे कात्रजमधील आंबेगाव परिसरात गांजा विक्रीसाठी आले होते.अमली पदार्थ विरोधी पथक कात्रज भागात गस्त घालत होते.

त्या वेळी दोघे जण दुचाकीवरुन नायलाॅनचे पोते घेऊन निघाले होते. रस्त्याच्या कडेला दोघांनी दुचाकी लावली. दोघे जण कोणाची तरी वाट पाहत होते. त्यांच्याकडे असलेल्या पोत्यात गांजा असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली.पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले.

त्यांच्याकडील असलेल्या पोत्याची तपासणी करण्यात आली.

पोत्यात २९ किलो गांजा सापडला.

गांजा, मोबाइल संच, दुचाकी असा चार लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# विद्यार्थी दशेत घेतलेला निर्णय भविष्याचा पाया रचतो - शत्रुघ्न काटे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपळे सौदागर : "१०वी आणि १२वी हे विद्यार्थी दशेतले आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. हे केवळ परीक्षेचे निकाल नसून, आपल्या पुढील आयुष्याची दिशा ठरवणारे क्षण आहेत. या टप्प्यावर घेतलेला प्रत्येक निर्णय आपल्या भविष्याचा पाया रचतो," असे प्रतिपादन भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी केले. पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील १०वी आणि १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आज सकाळी १० वाजता बासुरी बँक्वेट हॉल, हॉटेल गोविंद गार्डन, पिंपळे सौदागर येथे भव्य सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन सेमिनारचेही यशस्वी आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक आणि भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला देत ते म्हणाले, "यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो. कठोर परिश्रम आणि सातत्य हेच यशाची गुरुकिल्ली आहे. अपयश ही यशाची पहिली पायरी असते, त्यातून शिका आणि नव्या जोमाने पुन्हा प्रयत्न करा."या समारंभात २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात एसएससी, एचएससी, सीबीएससी आणि आयसीएसई बोर्डांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ५५० विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रत्येक बोर्डामधून पहिले तीन क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना विशेष भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये सायकल, ट्रॉफी, गुड्डी बॅग, नोटबुक, पेन आणि प्रमाणपत्र यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनाही गुड्डी बॅग, नोटबुक, पेन आणि प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहन देण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात, बाकलीवाल ट्यूटोरियल्स संचालक आणि आयआयटी मुंबईचे माजी विद्यार्थी वैभव बाकलीवाल यांनी विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन केले. त्यांनी विविध करिअर संधी, योग्य शाखा निवडण्याचे महत्त्व आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांबद्दल सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे निरसन करत त्यांनी योग्य मार्गदर्शन द्वारे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला.याप्रसंगी बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. काटे यांनी कौशल्य विकास, सामाजिक भान आणि आरोग्याचे महत्त्व यावरही भर दिला. "तुम्ही उद्याचे नागरिक आहात. समाजाप्रती तुमची काहीतरी जबाबदारी आहे. शिक्षणाचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी नव्हे, तर समाजाच्या भल्यासाठीही करा," असे सांगत शेवटी, त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमामुळे आमच्यात खूप आत्मविश्वास वाढला आहे. आम्हाला भविष्यात काय करायचं, कोणत्या दिशेने जायचं, याची योग्य दिशा मिळाली आहे. हा सत्कार समारंभ आणि करिअर मार्गदर्शन सेमिनार आमच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला, असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी यावेळी दिली.

यावेळी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे,जयनाथ काटे,ऍड. राजाभाऊ जाधव,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुणे विभाग कार्यवाह मुकुंदजी कुलकर्णी,प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे,भानुदास काटे पाटील,अनिता काटे,वैभव बकलीवाल,वसंत काटे,महेश लोणारे, विबगेयोर स्कुल प्रिंसिपल मीनाक्षी मेस्त्री,अरुण चाबुकस्वार, संदीप काटे,राजेश पाटील,विजूदादा धनवटे,पोपट काटे,विजय काटे,प्रवीण कुंजीर,बाळकृष्ण परघळे,मनोज ब्राम्हणकर,योगेश मिश्रा,सुप्रिया पाटील,दिपक गांगुर्डे,विजय पाटील,शितल पटेल, सुशील भाटिया,सुनील उपाध्याय तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

त्यांनी त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा भारद्वाज आणि सागर बिरारी यांनी केले.

# ‘हिंजवडी आयटी पार्क’मधील आयटीयन्ससाठी ‘आशेचा किरण’

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत





पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ‘हिजवडी आयटी पार्क’ला समस्यांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आता राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार, आयटी फोरम आणि सोसायटी फेडरेशनसह स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, संबंधित विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात येणार आहे.हिंजवडी आयटी पार्क यावर्षी पहिल्याच पावसात अक्षरश: ‘वॉटर पार्क’ झाला. वाहतूक कोंडी, पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव आणि वीज समस्यांमुळे या आयटी पार्कमधील आयटीयन्स आणि विविध कंपन्यांचे अधिकारी अक्षरश: हैराण झाले आहेत. त्यामुळे आयटीयन्स आणि सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून ‘अनलॉग हिंजवडी’ असे स्वाक्षरी अभियान राबवले होते. या अभियानाला सुमारे 30 हजार आयटीयन्सनी पाठिंबा दिला आहे.दरम्यान, हिंजवडी आयटी पार्कच्या समस्यांबाबत ठोस उपाययोजना करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये एमआयडीसी, जिल्हा परिषद, पीएमआरडीए, महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अशा सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसह आयटी फोरम आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींची सविस्तर आढावा बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली होती. त्यानुसार, गुरूवारी, दि. 10 जुलै रोजी दुपारी 2 वाजता मंत्रीमंडळ, सभागृह, विधानभवन येथे बैठकीचे नियोजन केले आहे. या बैठकीत आयटीयन्स आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींना बाजू मांडता येणार आहे. तसेच, प्रमुख लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून सुमारे 5 लाख आयटी कर्मचारी व अधिकारी नियमित ये-जा करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीची मोठी समस्या आहे. तसेच, एमआयडीसी, जिल्हा परिषद, पीएमआरडीए, महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अशा विविध विभागांमध्ये सक्षम समन्वय नाही. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधांचा प्रश्न निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा आयटी पार्क पण सुविधांअभावी जगभरात शहराची प्रतिमा मलीन होते आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करावा, अशी विनंती केली आहे. त्याबाबत बैठकीमध्ये निश्चितपणे ठोस निर्णय होईल, असा विश्वास आहे.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा,